**पुणे मेट्रो मार्गिका - ३**
**(हिंजवडी-माण-शिवाजीनगर)**
विकास नियंत्रण नियमावलीमध्ये टी.ओ.डी. बाबतच्या विनियमाद्वारे अनुज्ञेय करण्यात आलेल्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाकरिता अधिमूल्याचा दर निश्चित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२**
**दिनांक -३०/०६/२०२०**

## आदेश

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३ :-** ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ आणि प्रादेशिक योजना - पुणे अंतर्गत क्षेत्रांसाठी विविध अधिसूचनांद्वारे संबंधित विकास नियंत्रण नियमावली मंजूर करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, मेट्रो प्रकल्पासाठी ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट (टी.ओ.डी.) धोरणाबाबतचा विनियम (यापुढे "उक्त विनियम" असे उल्लेखिलेला) पुणे महानगरपालिकेच्या मूळ व वाढीव हद्दीसाठीच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०१७ मध्ये आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम ३७(१कक) अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरू करण्यात आली असून सदर प्रस्तावित फेरबदल तातडीने अंमलात आणण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये निदेश देण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नमूद विविध क्षेत्रांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत, ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट (टी.ओ.डी.) अंतर्गत अनुज्ञेय होणाऱ्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी आकारण्यात यावयाच्या अधिमूल्याचा दर निश्चित करणे आवश्यक आहे;

आता त्याअर्थी, उपरोक्त नमूद विविध क्षेत्रांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीतील संबंधित नियमानुसार अनुज्ञेय होणाऱ्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी आकारण्यात यावयाच्या अधिमूल्याचा दर शासन खालीलप्रमाणे निश्चित करीत आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA MUMBAI 32 सत्यमेव जयते



Scanned with CamScanner

| अ. क्र. | इमारतीचा वापर | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करताना अधिमूल्य आकारणीसाठी संबंधित जमिनीच्या वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यात नमूद दरानुसार आकारावयाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | रहिवास वापर | ६०% |
| २ | वाणिज्य वापर | ७५% |

०२. वर नमूद केल्यानुसार वसूल झालेल्या अधिमूल्याच्या रकमेपैकी ५०% रक्कम संबंधित नागरी वाहतूक परिवहन प्रकल्पाशी संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाकडे तर उर्वरित ५०% रक्कम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात यावी.

०३. वरीलनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी अधिमूल्य आकारणीबाबतच्या इतर अटी व शर्ती संबंधित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनूसार कायम राहतील.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Gokhale

( किशोर गोखले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

३) आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे.

४) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

५) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई.

६) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

७) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.



Scanned with CamScanner